RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष १०, अंक ५(२)] मंगळवार, जानेवारी ९, २०२४/पौष १९, शके १९४५ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक १७

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### गृह विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई, ४०० ०३२, दिनांक ९ जानेवारी, २०२४.

### अधिसूचना

**महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम.**

क्रमांक एफएलआर ०६२२/प्र.क्र.१५०/राउशु-२.— ज्याअर्थी, मुंबई दारूबंदी (विशेषाधिकार शुल्क) नियम, १९५४ मध्ये आणखी सुधारणा करून खालील नियम तात्काळ अंमलात आणले जावेत आणि म्हणून, महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम (१९४९ चा २५ वा) चे कलम १४३ चे पोट-कलम (३) च्या परंतुकानुसार तरतूद केल्याप्रमाणे पूर्वप्रसिद्धीशिवाय हे नियम करण्यात यावेत, असे महाराष्ट्र शासनास वाटते ;

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम (१९४९ चा २५ वा) चे कलम १४३ चे पोट-कलम (३) च्या परंतुकासह पोट-कलम (२) च्या खंड (यु) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबत प्राधिकृत इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, मुंबई दारूबंदी (विशेषाधिकार शुल्क) नियम, १९५४ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी खालीलप्रमाणे नियम करीत आहे, ते असे :—

**१.** या नियमांना मुंबई दारूबंदी (विशेषाधिकार शुल्क) (सुधारणा) नियम, २०२४ असे संबोधण्यात यावे.

**२.** मुंबई दारूबंदी (विशेषाधिकार शुल्क) नियम, १९५४ नियम ५ (अ) नंतर खालील नियम समाविष्ट करण्यात येत आहे, जसे की :—

"५ (ब) करारद्वारे दिलेल्या अनुज्ञप्तीसाठी शुल्क :- मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ खालील नमुना "एफएल-२" अनुज्ञप्तीधारकाने कुठल्याही कराराद्वारे, अनुज्ञप्ती मंजुरी प्राधिकाऱ्याच्या पूर्वपरवानगीने एखाद्या अभिकर्त्यास अशी अनुज्ञप्ती कराराद्वारे चालविण्यास देण्यासाठी विशेषाधिकार शुल्क म्हणून दरवर्षी लागू असलेल्या वार्षिक अनुज्ञप्ती शुल्काच्या ५० टक्के शुल्क आकारण्यात यावे."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रविंद्र औटे,**
शासनाचे उप सचिव.

## HOME DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, Dated 9th January, 2024.

*NOTIFICATION*

Maharashtra Prohibition Act.

No. FLR-0622/C.R.150/EXC-2.— Whereas the Government of Maharashtra considers that the following rules further to amend the Bombay Prohibition (Privileges Fees) Rules, 1954, should be brought into force at once, and therefore, the rules should be made without previous publication as provided by the proviso to sub-section (*3*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act (XXV of 1949) ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by clause *(u)* of sub-section (*2*) read with proviso to sub section *(3)* of section 143 of the Maharashtra Prohibition Act (XXV of 1949); and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Bombay Prohibition (Privileges Fees) Rules, 1954, as follows, namely :—

1. These rules may be called the Bombay Prohibition (Privileges Fees) (Amendment) Rules, 2024.

2. After rule 5A of the Bombay Prohibition (Privileges Fees) Rules, 1954, the following rule shall be added, namely :—

"5B. Fees for conducting agreement of licences :— The fees payable by any licensee for privilege of having the agreement for conducting business of his licence in Form FL-II granted under Bombay Foreign Liquor Rules, 1953 under any agreement, to any person being his agent with the previous sanction of the licensing authority granting the licence, shall be 50 percent of applicable licence fee, which shall be levied annually.".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAVINDRA AUTE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.